**आजचा शुभ विचार**

"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वत:च्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-57 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thursday 02 July 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ५७ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ गुरुवार, दि. ०३ जुलै २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये

## परवानाधारक व्यापाऱ्यांनाच बांधावर जाऊन शेतमाल खरेदीची परवानगी

संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



बांधावर जाऊन शेतमाल खरेदी करणे अडचणीचे होत आहे. यामधून शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे प्रकार राज्यात निदर्शनास येत आहेत. त्यामुळे यापुढे बांधावर जाऊन शेतमाल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांना संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीचा परवाना बंधनकारक करण्यात येणार आहे. परवाना असलेल्या व्यापाऱ्यांनाच संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीच्या क्षेत्रात बांधावर जाऊन शेतमाल खरेदीची परवानगी देण्यात येईल, असे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य दौलत दरोडा यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना मंत्री रावल म्हणाले, अकोला जिल्ह्यातील अंदुरा ॲग्रो प्रोड्यूसर कंपनीने (ता. बाळापूर) शेतकऱ्यांचा सोयाबीन शेतमाल खरेदी केला. खरेदी केलेला शेतमाल वखार महामंडळाच्या गोदामात ठेवण्यात आला. वखार महामंडळाच्या गोदामातील पावत्या आणि खरेदी केलेल्या शेतमालामध्ये १,२९७ क्विंटलची तफावत आढळून आली आहे. याबाबत कंपनीचे मालक व अन्य ११ लोकांवरती गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तफावतीचे पैसे शेतकऱ्यांना देण्यासाठी कंपनीचा बाजार समितीकडून देय असलेला ३६ लाख रुपयांचा निधी अडकविण्यात आला आहे. शेतकऱ्यांचे पैसे तातडीने देण्यासाठी वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

शेतीशी संबंधित शेतकऱ्यांचे फसवणुकीचे गुन्हे कमी करण्यासाठी 'कृषी गुन्हे शाखा' आणि कृषी न्यायालय स्थापन करण्याबाबत शासन सकारात्मक आहे. यावर्षीच्या हंगामासाठी सोयाबीन खरेदी केंद्र वाढविण्याबाबत शासन सकारात्मक आहे. मागील वर्षात राज्यामध्ये देशातील सर्वाधिक ११ लाख २१ हजार क्विंटल सोयाबीन खरेदीचा उच्चांक करण्यात आला. या वर्षी सुद्धा हाच प्रयत्न राहणार आहे असेही पणन मंत्री रावल यांनी सांगितले. प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य भास्कर जाधव, नाना पटोले, कैलास पाटील, सुधीर मुनगंटीवार, रोहित पवार, रणधीर सावरकर, असलम शेख, श्रीमती सुलभा खोडके यांनीही सहभाग घेतला.

## राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान - एकनाथ शिंदे

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------



राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याच्या निर्णयावर शासन ठाम असून, संबंधित शाळांनी विहित नियमांची पूर्तता केली असल्यास त्यांना लवकरच पुढील टप्प्याचे अनुदान देण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत दिली.

विधानपरिषद सदस्य किरण सरनाईक यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, राज्यात पूर्वी अनेक शाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली होती. मात्र, २००९ नंतर 'कायम' शब्द काढून टाकत टप्प्याटप्प्याने या शाळांना अनुदान देण्याचा मार्ग स्वीकारण्यात आला. २०१६, २०१८ आणि नंतर २०२३ पर्यंत अनेक शाळांना अनुदान दिले गेले असून, आता पुढील टप्प्यातील शाळांसाठी १० ऑक्टोबर २०२४ रोजी बैठक घेण्यात आली आणि 14 ऑक्टोबर 2024 रोजी याबाबतचा शासन निर्णयही काढण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, शाळांना एकाच वेळी संपूर्ण अनुदान देणे शक्य नसले, तरीही टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याचे काम निश्चितपणे पूर्ण करू. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संबंधित विभागामध्ये चर्चा करून याबाबतचा लवकरच निर्णय घेतला जाईल, असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

राज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले की, अनुदानाचा पुढील टप्पा देण्यास शासन कटीबद्ध असून त्यासाठी लवकरच आर्थिक तरतूद करण्यात येईल. यावेळी झालेल्या चर्चेमध्ये सदस्य किशोर दराडे, ज. मो. अभ्यंकर, जयंत आसगावकर, राजेश राठोड यांनी सहभाग घेतला.

## पुणे घाटमाथ्यावर रेड अलर्ट! कोकण, मराठवाड्यात वादळी पावसाचा अंदाज; IMD ने माहिती दिली

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------



दोन दिवसांपासून संपूर्ण महाराष्ट्रात पावसाने हजेरी लावली आहे. अनेक ठिकाणी पावसाचा जोर वाढला असून, भारतीय हवामान विभागाने (IMD) आज पुणे घाटमाथ्यावर वादळी पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. तळ कोकणासह किनारपट्टीच्या भागांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यातही वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे.

पूर्व भारतातील अनेक भागांमध्ये पुढील सहा ते सात दिवस मान्सून सक्रिय राहणार असून, प्रचंड पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. प्रादेशिक हवामान केंद्रानुसार, पुढील चार ते पाच दिवस कोकण किनारपट्टी, मुंबई, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यात मेघगर्जनेसह वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

पुढील ४-५ दिवस कोकणात,मुंबई, ठाणेसह व मध्य महाराष्ट्रातील घाट भागात, भिन्न तीव्रतेसह मुसळधार पावसाची शक्यता. विदर्भाच्या काही भागातही मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता.

कोकण किनारपट्टीत गेल्या काही तासांपासून पावसाचा जोर वाढला आहे. रायगड जिल्ह्याला आज (2 जुलै) आणि उद्या (3 जुलै) ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. हवामान विभागाकडून नागरिकांना सतर्कतेचे आवाहन करण्यात आले आहे.

विदर्भातही अनेक ठिकाणी दुपारच्या सुमारास जोरदार पाऊस झाला. अकोला, अमरावतीसह वाशिममध्येही मुसळधार पाऊस नोंदवला गेला. मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी ढगाळ वातावरण असून, काही ठिकाणी हलक्या सरी बरसल्या आहेत.

**२ जुलै:** पुणे घाट परिसरात रेड अलर्ट. तळ कोकणासह किनारपट्टीच्या सर्व जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट (उदा. सातारा, कोल्हापूर, नाशिक घाट परिसर). मुंबई, पालघरमध्ये यलो अलर्ट. नाशिक, कोल्हापूर, धुळे, नंदुरबार, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया या जिल्ह्यांनाही यलो अलर्ट.

**३ जुलै:** सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड तसेच पुणे, सातारा व कोल्हापूर घाट परिसरात पावसाचा ऑरेंज अलर्ट. मुंबई, ठाणे, पालघर व नाशिक घाट परिसरात पावसाचा यलो अलर्ट.

**४ जुलै:** सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड तसेच पुणे व सातारा घाट परिसरात यलो अलर्ट. कोल्हापूर घाटमाथ्यावर जोरदार पावसाची शक्यता असून ऑरेंज अलर्ट. विदर्भात गोंदिया व गडचिरोलीमध्ये यलो अलर्ट.

**५ जुलै:** रत्नागिरी, रायगड तसेच पुणे, सातारा व कोल्हापूर घाटमाथ्यावर तसेच चंद्रपूरमध्ये ऑरेंज अलर्ट. सिंधुदुर्ग, मुंबई, ठाणे, पालघर, जालना, परभणी, हिंगोली, वाशिम, अकोला, यवतमाळ, वर्धा, नागपूर, गडचिरोली, गोंदिया येथे यलो अलर्ट.

**नागरिकांनी हवामान विभागाच्या सूचनांकडे लक्ष द्यावे आणि आवश्यक ती खबरदारी घ्यावी.**




अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

सम्पादकीय

# 'एसटी'सुद्धा खासगीकरणाकडे?

गेल्या काही वर्षांत एसटी महामंडळ आर्थिक संकटात सापडले. गेल्या ४५ वर्षांत फक्त ८ वेळाच एसटी नफ्यात होती. एसटीच्या आर्थिक कोंडीला बेकायदा वाहतूक कारणीभूत ठरली असून संचित तोटा १० हजार ३२२.३२ कोटींवर गेल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले आहे. राज्यातील खेड्या-पाड्यात, गावागावांतून विहार करणारी आपल्या सर्वांची लाडकी लाल परी गेल्या काही वर्षांपासून आर्थिक कोंडीत सापडली आहे. एसटी महामंडळाची आर्थिक कोंडी दिवसेंदिवस वाढत असून बेकायदा वाहतूक एसटीच्या तोट्यास मुख्य कारण ठरले आहे. एसटी गाड्यांची कमतरता, तोट्यातील मार्गावर गाड्या चावलणे, विशेष म्हणजे तिकीट दरात वाढ करण्यात येणारी अडचण यामुळे एसटी महामंडळाला आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. एसटी महामंडळाची आर्थिक कोंडी दिवसेंदिवस वाढत असून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पीएफ, ग्रॅज्युटी या पोटी ३ हजार ५०० कोटी रुपये कर्मचाऱ्यांना देणे आहे. एसटी महामंडळ आर्थिक संकटात सापडली आहे. त्याचप्रमाणे एसटीच्या गाड्यांच्या संख्येत घट होत असून २०११-१२ साली १८,२७५ बसेस होत्या. मात्र २०२४-२५ पर्यंत बसेसची संख्या घसरून १५,७६४ वर आली आहे. त्यात खासगी ट्रॅव्हल्सची घुसखोरी एसटी महामंडळासाठी डोकेदुखी ठरत आहे. सन २०१८-१९ मध्ये एसटीचा संचित तोटा सुमारे ४६०० कोटी होता; परंतु कोरोना महामारीच्या काळात लॉकडाऊनमुळे व नंतर चाललेल्या कर्मचाऱ्यांच्या दीर्घकालीन संपामुळे तो संचित तोटा आता १०,३२२.३२ कोटींवर पोहोचला आहे. कर्मचाऱ्यांचे देणे सुमारे ३ हजार कोटींपर्यंत आहेत. शासनाने अनुदान स्वरूपात एसटी महामंडळाला मदत करणे अत्यंत आवश्यक असून एसटीची आर्थिक गाडी रुळावर आणणे खूप आवश्यक बनले आहे. गेली अनेक वर्षे सातत्याने तोट्यात असलेल्या एसटी महामंडळाला येत्या ४ वर्षांत फायद्यात आणण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही परिवहन मंत्र्यांनी दिली आहे.

राज्यातील तब्बल ९० टक्के लोकसंख्येला थेट परिवहन सेवा देणारी एसटी ही महाराष्ट्राची 'लोक वाहिनी' आहे. दररोज सुमारे ५५ लाख प्रवाशांना सुरक्षित दळणवळण सेवा देणारी एसटी भविष्यात आर्थिकदृष्ट्या सक्षम असणे, ही काळाची गरज आहे. एसटीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी देखील संस्थेचा आर्थिक तोटा कमी करण्यासाठी आपल्या कामाची उत्पादकता वाढवणे आणि योग्य ठिकाणी काटकसर करून बचत करणे आवश्यक आहे. दरवर्षी ५ हजार नवीन बस आपल्या ताफ्यात समावेश तसेच उच्च दर्जाच्या व्होल्वो बस भाडे तत्त्वावर घेणार असून महामंडळाच्या जागांवर खासगी वाहनांसाठी इंधन पंप उभारणार आहे. एसटी महामंडळाच्या आगारांचा विकास केला जाणार असून सी-कॅटेगरी मार्गांचे बी-कॅटेगरीत व बी-कॅटेगरीचे ए-कॅटेगरीत रूपांतर करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. प्रवासी सुविधांचा दर्जा उंचावला जाणार असून खर्च कमी करण्यासाठी ५ हजार एलएनजी आणि १ हजार सीएनजी बसेसचा समावेश केला जाणार आहे. १९८१-८२ मध्ये ७९,४५८ कर्मचारी संख्या होती. १९९१-९२ मध्ये १,१२,२०० इतकी झाली; मात्र अलीकडे ८६, ३१७ इतकीच राहिली आहे. कमी मनुष्यबळातून आर्थिक उन्नती साधली जाणे हे कर्मचाऱ्यांसाठी मोठे आव्हान ठरणार आहे. एसटी महामंडळास शासनाचा आर्थिक आधार मिळाला असून २००१ ते २०२४ दरम्यान शासनाकडून ६, ३५३.८० कोटींची भांडवली मदत मिळाली. कोविड काळात आणि संपाच्या पार्श्वभूमीवर ४,७०८.७३ कोटी अनुदान दिले गेले. गेल्या चार वर्षांत ९, ९२२.७८ कोटींचे अनुदान मिळाले आहे. असे असले तरी एसटी महामंडळाची आर्थिक कोंडी दिवसेंदिवस वाढत असून इंधनाचा खर्च, गाड्यांचे सुटे भाग खरेदी करणे, भाडेतत्त्वावरील बसेसचा खर्च, टोल अशा विविध गोष्टींवर वर्षाला कोट्यवधी रुपयांचा खर्च होतो. त्यामुळे उत्पन्नापेक्षा खर्च अधिक असून दर महिन्याला कर्मचाऱ्यांचा पगार वेळेवर देणे शक्य होत नाही. त्यामुळे एसटी महामंडळातील तब्बल ८६ हजार ३१७ कर्मचाऱ्यांना पगारासाठी दर महिना प्रतीक्षा करावी लागते. एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांना पगार देण्यासाठी राज्य सरकारने अनुदान उपलब्ध करून द्यावे लागेल, तरच कर्मचाऱ्यांना पगार देणे शक्य होणार आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यात एसटीची सेवा असून प्रवाशांना सुरक्षित स्थळी पोहोचवण्याची जबाबदारी वाहक व चालक पार पाडतात, तर प्रशासकीय कामकाज हाताळणारे कर्मचारी आपली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडतात. मात्र कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. मात्र आजही कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न कायम आहे. महामंडळाची गाडी नफ्यात धावली तरच कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार देणे शक्य होईल, नाही तर सरकारकडे वारंवार हात पसरण्याची वेळ येणार आहे. आजच्या घडीला कर्मचाऱ्यांची ७ हजार कोटींची देणी थकली आहेत. आर्थिक श्वेतपत्रिकेत पीएफ ग्रॅज्युटीचा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र महागाई भत्ता, वेतनाचा फरक, घर भाडे याचा उल्लेख श्वेतपत्रिकेत करण्यात आलेला नाही. समस्या भरपूर आहेत. मात्र कर्मचाऱ्यांवर भरोसा ठेवला तर यातूनही मार्ग निघू शकेल. मात्र खासगीकरण नको असाच सध्या कर्मचाऱ्यांचा सूर आहे.

गेल्या आठवड्यात एसटी महामंडळाच्या आर्थिक संकटाची श्वेतपत्रिका जाहीर करण्यात आली. आता यावर उपाय म्हणून फायद्यात येण्यासाठी एसटी महामंडळाच्या उत्पन्न वाढीसाठी हायटेक व्होल्व्हो बसेसचा समावेश करण्यात येणार आहे. एसटीच्या जागा म्हणजेच बस स्थानके व बस आगारे यांचा विकास केला जाणार आहे. खर्चात कपात करण्यात येणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी आता सांगितले आहे. म्हणजेच दुसऱ्या पावलांनी एसटी महामंडळाचे खासगीकरण तर सुरू होणार नाही ना अशी भीती आता कर्मचाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

# आनंद जेष्ठ नागरिक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत






पोस्टल कॉलनी वाकड येथील आनंद जेष्ठ नागरिक संघाची १२वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि २९जून २०२५रोजी बर्ड व्हॅली वाकड येथे ठीक अकरा वाजता संपन्न झाली. यात पहिल्या सत्राची सुरुवात राष्ट्रगीताने होऊन त्यानंतर मागील महिन्यात देवाज्ञा झालेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.मयूरभाऊ कलाटे, मा नगरसेवक पिंपरी चिंचवड, सौ स्वातीताई कलाटे मा. नगरसेविका पिंपरी चिंचवड,मा वृषाली मरळ अध्यक्षा जेष्ठ नागरिक महासंघ हे होते तर अध्यक्षस्थानी आनंद जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री भागवत कोल्हे हे होते. या प्रसंगी प्रथम सरस्वती पूजन श्री मयूर भाऊ ह्यांच्या हस्ते होऊन त्यानंतर सौ स्वाती कलाटे,मा स्वाती मरळ,आनंद संघाचे अध्यक्ष भागवत कोल्हे,उपाध्यक्ष मुरलीधर लहाने,सचिव श्री सुरेश बोरकर,कोषाध्यक्ष माधव बह्राटे आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. त्यानंतर संघामध्ये नव्याने स्थापन झालेल्या सांस्कृतिक कला मंचतील कलाकार प्रतिभा गवळे,पुष्पा ढवळे, विभा देरेकर, सुनील जोशी,माधव बह्राटे, हर्षाली देसाई,हेमांगी बोंडे, विनया सरदेसाई,संगीता साठे,सुनीता सफई इत्यादीनी
गणेश वंदना, शारदा स्तवन, स्वागत गीत, समूह गीत सादर केले. त्यानंतर उपस्थित मान्यवर मयूर कलाटे,सौ स्वाती कलाटे,श्रीमती स्वाती मरळ,दीप्ती रहटे,विष्णू तांदळे,मुकुंद दमकले, सारिका अटेकर यांचा स्वागत आणि सत्कार समारंभ संस्थेचे पदाधिकारी अध्यक्ष श्री भागवत कोल्हे,श्री मुरलीधर लहाने,श्री सुरेश बोरकर,श्रीमती स्वाती मरळ यांच्या हस्ते पार पडला. त्यानंतर सौ स्वाती कलाटे यांनी संघ हा जेष्ठांसाठी उत्तम व्यासपीठ असल्याचे सांगितले तर श्रीमती मरळ यांनी महासंघाच्या कार्याची माहिती दिली.मा.कोल्हे यांनी संघाच्या कार्याची महती सांगणारी श्रीमती विजया चौधरी यांची कविता वाचून दाखवली.त्यानंतर पत्रकार बाबू डिसुझा, अहवाल पुस्तिका तयार करणारे अविनाश रानडे यांच्यासह ७५ वर्षे पूर्ण झालेल्या सभासद किशोर भावे,सुहास राव, राजाराम डिके, कामराज पाटील, सावित्रीदेवी विश्वकर्मा, विनया मुजुमदार, शकुंतला पवार आदींचा सत्कार शाल,श्रीफळ सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.या प्रसंगी प्रशांत डिके यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर काही विशेष सत्कार देण्यात आले.त्यामध्ये नवविवाहित जेष्ठ दाम्पत्य श्री मुरलीधर लहाने व सौ आसावरी लहाने यांचा तसेच सौ रेखा गिरमे आयुष संस्थेची योग परीक्षा उत्तीर्ण होऊन योग शिक्षिका पदवी झाल्याबद्दल, श्री प्रवीण कुलकर्णी यांचा संघासाठी सर्वोच्च निधी संकलन केल्याबद्दल असे विशेष पुरस्कार देण्यात आले. त्यानंतर दुसऱ्या सत्रात श्री बोरकर यांनी मागील वर्षच्या मिटिंगविषयी सांगितले तर श्री मुरलीधर लहाने यांनी अहवाल वाचन केले तर जमा खर्च ,ताळेबंद,अंदाजपत्रक इ आर्थिक बाबींची माहिती माधव बह्राटे यांनी दिली. सभेच्या शेवटी पसायदान होऊन त्यानंतर सुरुची भोजन होऊन सभेची सांगता झाली.या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती विजया चौधरी यांनी केले.असे आंनद जेष्ठ नागरिक संघाचे प्रसिद्धी विभागाची धुरा सांभाळणारे श्री अशोक बोंडे आणि सौ हेमांगी बोंडे कळवितात.

# देगलुरात नऊ लाखांचा गुटखा जप्त; हिंगोलीतील दोघांवर गुन्हा दाखल

## वझरगा येथे पोलिसांची धडक कारवाई; पांढऱ्या स्विफ्ट डिझायर कारसह मोठा मुद्देमाल जप्त

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत




तालुक्यातील वझरगा येथे सोमवार, दिनांक ३० जून रोजी संध्याकाळी सातच्या सुमारास देगलूर पोलिसांनी प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या दोन जणांवर कारवाई करत एकूण नऊ लाख वीस हजार चारशे रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलिसांनी मिळालेल्या गुप्त माहितीनंतर तात्काळ कृती करत केली. या कारवाईत शेख साजीद शेख जलाल बागवान (वय ३८) व शेख अख्तर शेख गफार बागवान (दोघेही रा. सदर बाजार, जामा मस्जिद जवळ, हिंगोली) या दोन आरोपींना अटक करण्यात आली. हे दोघे पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट डिझायर (MH १२ KN ६०३९) कारमधून प्रतिबंधित सुगंधी तंबाखू आणि गुटख्याची वाहतूक करत असल्याची माहिती देगलूर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी वझरगा येथे सापळा रचून संबंधित कार अडवून तपासणी केली असता मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित माल आढळून आला. पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालात पुढील वस्तूंचा समावेश आहे:

विमल केशरयुक्त पान मसाला – १५ पोते – ₹१,४१,००० व्ही.१ बीग टोबॅको – २० पुडे – ₹९,००० रजनीगंधा पान मसाला – ₹३६,००० सिग्नेचर पान मसाला – २२४ पुडे – ₹१,३४,००० वाहतूक करणारी कार (स्विफ्ट डिझायर, पांढऱ्या रंगाची) – अंदाजे ₹६,००,०००

एकूण जप्त मुद्देमालाची किंमत ₹९,२०,४०० एवढी आहे. या प्रकरणी संबंधित आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक मारुती मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकातील कृष्णा तलवारे, साहेबराव सगरोळीकर, वैजनाथ मोटारगे, राजवंत सिंघ बुंगई व रंजीत मुदिराज यांनी संयुक्तपणे केली. पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध गुटखा तस्करीला मोठा आळा बसला असून, नागरिकांतून पोलिसांचे कौतुक करण्यात येत आहे.

# लक्ष्मीकांत कद्रेकर यांचा सेवापूर्ती सोहळा कार्यक्रम संपन्न

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत




शासनाच्या सेवा क्षेत्रात माणुसकीचे व्रत जपणारे लक्ष्मीकांत कद्रेकर यांचा सेवानिवृत्ती समारंभ ०२ जुलै रोजी तहसील कार्यालय देगलूर येथे संपन्न झाला. २५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ते पेशकार पदावरून निवृत्त झाले. त्यांच्या सेवा कार्याची आणि जनसामान्यांसाठी असलेल्या त्यांच्या आत्मीयतेची उपस्थितांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. कार्यक्रमाला तहसीलदार भरत सूर्यवंशी, नायब तहसीलदार गिरीश सर्कलवाड, नायब तहसीलदार गंदी गुडे मॅडम, नायब तहसीलदार पदमवार साहेब यांच्यासह प्रशासनातील अनेक अधिकारी, कर्मचारी व कद्रेकर यांचा परिवार उपस्थित होता. कद्रेकर यांनी आपल्या सेवाकाळात हदगाव, नांदेड व देगलूर उपविभागीय कार्यालयात काम करताना शेकडो नागरिकांची कामे प्रामाणिकपणे केली. त्यांच्या समजूतदार व मृदू स्वभावामुळे ते 'मामा' नावानेच ओळखले जात होते. निरोप समारंभात तहसीलदार भरत सूर्यवंशी यांनी कद्रेकर यांच्या सेवेचं विशेष कौतुक करताना सांगितलं की, "ते केवळ कर्मचारी नव्हते, तर गरिबांचा आधार होते." आपल्या मनोगतात कद्रेकर यांनी सर्व सहकाऱ्यांचे व वरिष्ठांचे आभार मानले. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला...

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर, जाहिरात प्रतिनिधी, गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

# कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त 'कृषी दिन कार्यक्रम' – शेतकऱ्यांना दिले मार्गदर्शन

# सभापती चित्रेरखा चौधरी यांचा वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत









पंचायत समिती कार्यालय, गोरेगाव येथे माजी मुख्यमंत्री व शेतकऱ्यांचे कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त 'कृषी दिन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी तालुका कृषी विभाग व पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रम राबविण्यात आले. तसेच पंचायत समितीच्या आदर्श सभापती चित्ररेखा चौधरी यांच्या वाढदिवसानिमित्त ५०० झाडे लावून पर्यावरणपूरक पद्धतीने वाढदिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी कै. वसंतराव नाईक यांच्या कार्याचा आढावा घेत, त्यांनी शेतकऱ्यांसाठी राबविलेल्या योजना व धोरणांची आठवण करून दिली. या योजनांचा फायदा आजही ग्रामीण व कृषिप्रधान भागातील शेतकऱ्यांना होत असल्याचे त्यांनी सांगितले. 'कृषी दिना'च्या निमित्ताने शेतकऱ्यांना नवीन कृषी तंत्रज्ञान, नैसर्गिक शेती, पाणलोट विकास, खत व्यवस्थापन, पिक विमा योजना आदी बाबत माहिती देण्यात आली. कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि उपाययोजना सुचविल्या. कार्यक्रमात कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. गावपातळीवरील कृषी योजनांचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात आला. या कार्यक्रमाला गोंदिया जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष पंकज राहंगडाले, पंचायत समिती सदस्य किशोर पारधी, राष्ट्रवादी काँग्रेस महायुती तालुका अध्यक्ष केवल बघेले, पंचायत समिती सभापती चित्रेरखा चौधरी, तालुका कृषी अधिकारी लालन राजपूत, सरपंच निम्बा वर्षा ताई पटले तसेच कृषी विभाग, बांधकाम विभाग, मनरेगा, पशुसंवर्धन, आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी, विविध ग्रामपंचायतीचे सरपंच, शेतकरी व नागरिक, आशा सेविका, रोजगार सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुरी येथील अथवा अन्य धार्मिक स्थळी चेंगराचेंगरीचे गालबोट चिंताजनक!

ओडिशातील पुरी येथील भगवान जगन्नाथ रथयात्रेच्या वेळेस रविवार दिनांक २९ जून २०२५ ला सकाळी पहाटे ४ वाजून ३० मिनिटांनी भावीक श्रीगुंडीचा मंदिराच्या सामोरं भगवान जगन्नाथ यांचे दर्शन करण्यासाठी भक्तगण मोठ्या संख्येने जमा झाले होते याच वेळेस अचानक धक्का-मुक्की झाली अशा परिस्थितीत लोकांना काहीच समजेनासे झाले व चेंगराचेंगरी झाली यात ६ भाविकांचा मृत्यू झाला तर ५० पेक्षा अधिक लोक गंभीररीत्या जखमी झालेत.भगवान जगन्नाथ रथयात्रेच्या दरम्यान लाखोच्या संख्येने भाविक येतात त्यामुळे अशा दुर्घटनांवर स्थानिक प्रशासन,राज्य सरकार व केंद्र सरकारने करडी नजर ठेवने गरजेचे आहे.अशाच प्रकारे मे महिन्यात गोव्यातील लैराईदेवी यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी गोवा, महाराष्ट्र आणि कर्नाटक येथुन दरवर्षी ७० ते ८० हजार भाविक याठिकाणी पोहचत असतात.परंतु दिनांक ३ मे २०२५ शनिवारला गोव्याच्या उत्तर भागात असलेले शिरगांव येथील श्री लैराईदेवी मंदिरात पहाटे ३ ते ४ च्या दरम्यान भाविकांमध्ये अचानक चेंगराचेंगरीची घटना घडली यात ६ लोकांचा मृत्यू झाला होता व ८० पेक्षा अधिक गंभीर जखमी झाले होते.वार्षिक उत्साहासाठी हजारो भाविक अरूंद गल्ल्यांमधुन मंदिरात येत असतांना ही भयावह घटना घडली.मंदिरातील उत्सवासाठी किमान ३० ते ४० हजार भाविक एकत्र जमले होते.यातील काही जण उतार असल्याने खाली पडले.त्यामुळे इतरही लोक एकमेकांच्या अंगावर कोसळल्याने भयावह चेंगराचेंगरीचा घटना झाली.दरवर्षी कुठे ना कुठे चेंगराचेंगरीच्या घटनांचा प्रकार दिसून येतो. यामुळे जीवितहानी सुध्दा होते.त्याची पुनरावृत्ती आपल्याला पुरीच्या रथयात्रे दरम्यान श्री गुंडीचा मंदिराजवळ दिसून आली.अशाच प्रकारची घटना आंध्रप्रदेशातील प्रसिद्ध तिरूपती बालाजी मंदिराजवळ वैकुंठ व्दार दर्शनाच्या टोकन वितरण केंद्रावर झालेल्या चेंगराचेंगरीत दिनांक ८ जानेवारी २०२५ ला ६ जणांचा मृत्यू झाला होता व ४० हुन अधिक गंभीर जखमी झाले होते.टोकन वितरण केंद्र सकाळी ५ वाजता उघडण्याचे नियोजन होते.यासाठी भाविक रांगा लावू लागले व प्रचंड गर्दी झाली होती.विविध केंद्रावर सुमारे ४००० हजारहून अधिक भाविक रांगेत उभे होते व चेंगराचेंगरीमुळे मोठा गोंधळ उडाला आणि त्यात एका महिलेचा प्रथम मृत्यू झाला व नंतर गंभीर जखमी झालेल्या ५ भाविकांचा मृत्यू झाला अशाप्रकारे ६ भाविकांना चेंगराचेंगरीत आपले प्राण गमवावे लागले.देशात दरवर्षी अनेक ठिकाणी मंदिर परिसर, प्रवचन परिसर, किर्तन परिसर, गर्दीचे ठिकाण, रेल्वे स्टेशन किंवा अन्य ठिकाणी चेंगराचेंगरीचे प्रकार होतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी सुध्दा झालेली आहे आणि याचे जिवंत उदाहरण आपल्याला ओडिशातील पुरी येथील भगवान जगन्नाथ रथयात्रेच्या दरम्यान श्री गुंडीचा मंदिर परिसरात दिसून आले. चेंगराचेंगरीचे प्रकार का होतात याला मुख्य जबाबदार कोण याचाही विचार आपण सर्वसामान्यांनी, मंदिर प्रशासनाने व स्थानिक प्रशासनाने केला पाहिजे.कारण भाविकांनी भीड करायची व मंदिर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करायचे त्याचे प्रयचित्य भाविकांनी भोगायचे अशी परिस्थिती आज चेंगराचेंगरीच्या प्रकारात दिसून येते म्हणजेच "आ बैल मुझे मुझे मार" अशी परिस्थिती झालेली आहे.भारतातील चेंगराचेंगरीच्या अनेक भयावह घटना झालेल्या आहेत यामध्ये ५ मार्च २०१० ला उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला होता.भारतात बऱ्याच ठिकाणी अपुऱ्या आणि पायाभूत सुविधांच्या मर्यादांमुळे असुरक्षितता असते. अनेकदा दुर्गम ग्रामीण भागात, डोंगराळ प्रदेशात, टेकड्यांवर किंवा योग्य मार्ग नसलेल्या नदीकाठावर धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन केले जाते. अशा ठिकाणी असलेला तीव्र उतार, स्थळाची असमान भूरचना,अरुंद मार्ग, एकाच ठिकाणी भाविक एकत्रित येणे या कारणांमुळे धार्मिक कार्यक्रमामध्ये मोठे धोके निर्माण होतात. त्यातून चेंगराचेंगरीच्या घटना घडतात.धार्मिक किंवा सामूहिक कार्यक्रम घेताना व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष करते व दुर्घटना उद्भवतात. इंटरनॅशनल जर्नल ऑफ डिझास्टर रिस्क रिडक्शननं (आयजेडीआरआर)ने प्रकाशित केलेल्या २०१३ च्या अभ्यासात असं दिसून आलं की, भारतातील ७९ टक्के चेंगराचेंगरीचे ठिकाणे हे धार्मिक मेळावे आणि तीर्थयात्रेची ठिकाणे आहेत. विकसित देशांमध्ये बहुतेक चेंगराचेंगरी स्टेडियम, संगीत मैफिली आणि नाईट क्लबच्या ठिकाणी होतात. परंतु भारत आणि इतर विकसनशील देशांमध्ये चेंगराचेंगरीच्या बहुतेक दुर्घटना धार्मिक स्थळांवर होतात,असे केरळ सरकारच्या भू आणि आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे सहाय्यक प्राध्यापक फैसल टी. इलियास यांनी सांगितले.

४ जुलै २०२४ उत्तर प्रदेशातील हाथरस येथे एका धार्मिक कार्यक्रमात चेंगराचेंगरी होऊन किमान २७ जणांचा मृत्यू झाला,१७ फेब्रुवारी २०२४ उत्तर प्रदेशातील मथुरा येथील पूजनीय श्रीजी मंदिरात होळीपूर्वी झालेल्या कार्यक्रमादरम्यान चेंगराचेंगरीत किमान सहा भाविक बेशुद्ध पडले तर काही जण जखमी झाले,२४ डिसेंबर २०२३ मथुरा येथील बांके बिहारी मंदिरात गर्दीमुळे गुदमरून दोन महिला भाविकांचा मृत्यू झाला,१ जानेवारी २०२२ जम्मू आणि काश्मीरमधील प्रसिद्ध माता वैष्णोदेवी मंदिरात भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे झालेल्या चेंगराचेंगरीत १२ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले,२१ एप्रिल २०१९ तामिळनाडूच्या त्रिची येथील मंदिर उत्सवात चेंगराचेंगरीत सात जणांचा मृत्यू झाला,१० ऑगस्ट २०१५ झारखंडमधील देवघर शहरातील एका मंदिरात चेंगराचेंगरीत किमान ११ जणांचा मृत्यू आणि ५० जण जखमी झाले,१४ सप्टेंबर २०१४ आंध्र प्रदेशातील राजमुंद्री येथे 'पुष्करम' उत्सवाच्या उद्घाटनाच्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी जमली होती गोदावरी नदीच्या काठावरील एका प्रमुख स्नानस्थळावर चेंगराचेंगरीत २७ यात्रेकरूंचा मृत्यू आणि २० जण जखमी झाले,२५ ऑगस्ट २०२४ ला मध्यप्रदेशातील सतना जिल्ह्यातील एका मंदिरात अफवेमुळे चेंगराचेंगरी झाल्यानं दहा यात्रेकरू ठार आणि २० हून अधिक जखमी झाले, १३ ऑक्टोबर २०१३ मध्यप्रदेशातील दातिया येथील रतनगढ मंदिराजवळ चेंगराचेंगरीत ८९ जणांचा मृत्यू आणि १०० हून अधिक जखमी झाले,१४जानेवारी २०११ केरळमधील सबरीमाला मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत १०६ यात्रेकरू ठार तर १०० हून अधिक जखमी झाले,४ मार्च २०१० उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला, ३०सप्टेंबर २००८ राजस्थानमधील जोधपूरमधील मेहरानगड किल्ल्याच्या परिसरात असलेल्या चामुंडा देवी मंदिरात चेंगराचेंगरीत २४४ लोकांचा गुदमरून मृत्यू झाला,३ ऑगस्ट २००६ हिमाचल प्रदेशातील नैना देवी मंदिरात चेंगराचेंगरीत सुमारे १५० भाविकांचा मृत्यू आणि ४०० हून अधिक जखमी झाले, २६ जानेवारी २००५ ला पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील वाई जवळील मंदेर देवी मंदिरात वायरिंगमध्ये शॉर्ट सर्किटमुळे ठिणग्या निघाल्यानं घाबरलेल्या हजारो भाविकांनी गर्दी केली होती. मंदिराकडे जाणाऱ्या अरुंद मार्गावर गर्दी झाल्याने चेंगराचेंगरी झाली व लोक एकमेकांवर पडल्याने २९१ जणांचा मृत्यू झाला तर २०० हून अधिक जण जखमी झाले, २७ ऑगस्ट २००३ नाशिक कुंभातील पवित्र स्नानादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ३९ जणांचा मृत्यू झाला तर १४०जण जखमी झाले.चेंगराचेगरीच्या भयावह घटना पहाता त्या टाळण्यासाठी मंदिर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सर्वसामान्यांनी किंवा भाविकांनी गर्दीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याठिकाणी आपण जावे की नाही याचा गंभीरतेने विचार करूनच गेले पाहिजे. मंदिर परिसरातील वाढत्या चेंगराचेंगरीच्या घटना पहाता मंदिर प्रशासनावर राज्य सरकारने व केंद्र सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे व त्यांच्या चुका उघड करून कारवाई करून त्यात सुधारणा करण्याची आज गरज आहे.देशातील संपूर्ण मंदिरे हे भारतीय संस्कृतीचे आस्थेचे प्रतिक आहे आणि मंदिर प्रशासन व सरकार यांच्यात तालमेल व्यवस्थित असला तर चेंगराचेंगरीच्या भयावह घटना सहज टाळता येतात. अशाप्रकारे वरील भयावह घटना टाळण्यासाठी भाविक, मंदिर प्रशासन, स्थानिक प्रशासन,राज्य सरकार व केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष केंद्रित केले पाहिजे व अशा घटनांच्या बाबतीत सतर्कता बाळगली पाहिजे.कारण या दुर्घटना आपण सहज टाळु शकतो.याकरीता सर्वांनीच"जान है तो जहान है" हा मुलमंत्र अंगीकारला हवा आणि अशा गंभीर दुर्घटनांवर अंकुश लावला पाहिजे.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**नागपूर**

# दानवीरांचा स्मरणदिन; व्यापाऱ्यांचा सन्मानदिवस

## शिरूरमध्ये भामाशाह जयंती, व्यापारी दिन, डॉक्टर दिन, शेतकरी दिन मोठ्या उत्साहात साजरे

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------------



अखिल एकता उद्योग व्यापार मंडळ नवी दिल्लीच्या वतीने आयोजित व्यापारी मंडळाचा वर्धापन दिन, दानवीर भामाशाह जयंती, डॉक्टर दिन व शेतकरी दिन यानिमित्त ओम लाईट हाऊस, सरदार पेठ शिरूर येथे एकत्रितपणे भव्य व सन्मानपर कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. संदेश केंदळे होते. त्यांच्या शुभहस्ते उपस्थित मान्यवर व्यापारी, डॉक्टर, पत्रकार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला शहरातील व्यापारी, विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी व्यापाऱ्यानी बोलताना व्यवसायात येणाऱ्या काहीअडचणी सांगितल्या.

यावेळी दानवीर भामाशाह यांच्या जीवनकार्याचा आढावा घेण्यात आला. त्यांच्या बलिदानाची आठवण करून देत, आयोजकांनी उपस्थितांना प्रेरणादायी गोष्टी सांगितल्या. भामाशाह यांनी मेवाडच्या महाराणा प्रताप यांना संकटकाळात दिलेली आर्थिक मदत, त्यांचे राष्ट्रनिष्ठ योगदान आणि त्यांच्या कुटुंबाचे इतिहासातील महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

दानवीर भामाशाह – देशसेवेचे आदर्श उदाहरण

२८ जून १५४७ रोजी राजस्थानातील सादडी गावात जन्मलेले भामाशाह हे महाराणा प्रताप यांचे निकटवर्ती मित्र व सल्लागार होते. हल्दी घाटीच्या लढाईनंतर निराश महाराणांना त्यांनी स्वतःची संपत्ती अर्पण केली. त्यांच्या दानशूरतेमुळे महाराणा पुन्हा सैन्य उभारू शकले. त्यामुळेच आजही कोणी मोठे दान दिल्यास त्याला “दानवीर भामाशाह” असे गौरवाने संबोधले जाते. त्यांच्या नावाने टपाल तिकीटही २००० साली जारी झाले.

कार्यक्रमानंतर अखिल एकता उद्योग व्यापार मंडळाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रवीण भंडारी यांनी सर्व मान्यवर व उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांनी सांगितले की, "व्यापारी, डॉक्टर, शेतकरी आणि पत्रकार समाजाचे आधारस्तंभ आहेत. त्यांचा सन्मान म्हणजेच समाजाच्या मूळ शक्तीचा गौरव होय."

या कार्यक्रमातून सामाजिक एकतेचा व आदर्श व्यक्तिमत्त्वांची प्रेरणा घेण्याचा संदेश देण्यात आला. शिरूरमध्ये विविध दिनांचे संयुक्त आयोजन करून समाजातील सर्व घटकांना जोडणारा एक अभिनव उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

# कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या मांडण्यासाठी आमदार मंजुळाताई गावित यांना संघटनेचे निवेदन

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------------



पावसामुळे झालेल्या मोठ्या प्रमाणावरील नुकसानीमुळे साक्री व धुळे जिल्ह्यातील शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून, त्यांना मदतीची अत्यंत गरज आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या वतीने साक्री विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ. मंजुळाताई गावित यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनामध्ये पुढील मागण्या अधोरेखित करण्यात आल्या आहेत:

राज्यातील शेतकऱ्यांना झालेल्या कांदा नुकसानीची तत्काळ नुकसान भरपाई मिळावी. नाफेड आणि एनसीसीएफमार्फत बाजार समितींमध्ये प्रति क्विंटल ₹३००० दराने कांदा खरेदी करण्यात यावा. गुजरात राज्यात कांदा उत्पादकांना ₹२०० प्रति क्विंटल अनुदान दिले जात आहे, त्याप्रमाणे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनाही किमान ₹५०० प्रति क्विंटल अनुदान मिळावे. साक्री व धुळे जिल्ह्यातील पंचनामे पूर्ण झालेले असूनही नुकसान भरपाई अडकलेली आहे, ती त्वरित वितरित करण्यात यावी. शेतकऱ्यांची कर्जमाफी तातडीने जाहीर करण्यात

यावी. गुजरातप्रमाणे महाराष्ट्रातही शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत द्यावी.

कांद्याचे दर सध्या अत्यंत कमी असून, शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही वसूल होत नाही. त्यामुळे शासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे, धुळे जिल्हाध्यक्ष संजय भदाणे, युवा जिल्हाध्यक्ष गंगाधर शिंदे, साक्री तालुका अध्यक्ष अनिल भामरे, उपाध्यक्ष संजय बच्छाव यांची स्वाक्षरी असून, आमदार मंजुळाताई गावित यांनी शेतकऱ्यांच्या न्यायहक्कासाठी पावसाळी अधिवेशनात आवाज उठवण्याचे आश्वासन दिले.

"भारत हा कृषिप्रधान देश असून, शेतकऱ्यांचे जीवन सन्मानाने जगण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलली पाहिजेत," असे मत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केले. यासंदर्भात पावसाळी अधिवेशनात आवाज उठवावा, अशी मागणी शेतकरी संघटनेकडून आमदार मंजुळाताई गावित यांच्याकडे करण्यात आली आहे.

# ज्ञानाचे आणि विचारांचे मेजवानी ज्या ठिकाणी मिळत असते तो आनंद कोणत्याच मापाने मोजता येत नाही. प्राचार्य बी एस पाटील

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------



ज्ञानाची, आणि विचारांची मेजवानी ज्याठिकाणी मिळत असते तो आनंद कोणत्याच मापाने मोजता येत नाही. या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायची एकमेव जागा म्हणजे साक्रीचे श्री छत्रपती शिवाजी वाचनालय आहे. येथे होणारे सांस्कृतिक कार्यक्रम व बौद्धिक व्याख्यानं म्हणजे तरुणांसह, सर्वांसाठी दिशादर्शक असल्याचे मत प्राचार्य बी. एस पाटील यांनी व्यक्त केले. साक्री येथील श्री. छत्रपती शिवाजी वाचनालयाच्या नव निर्वाचित संचालक मंडळ व तालुक्यातील अन्य नवनियुक्त पदाधिका-यांचा साक्री तालुका मराठा सेवासंघ, निसर्ग मित्र समिती, ग्राहक पंचायत व प्रवासी महासंघ या सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने सत्काराचा कार्यक्रम, साक्री येथील शेतकरी सहकारी संघाच्या आवारातील मराठा सेवा संघाच्या पतसंस्थेच्या कार्यालयात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य बी.एस.पाटील, प्रमुख अतिथी हस्ती बँकेचे चेअरमन व प्रवासी महासंघाचे उपाध्यक्ष डाॅ.दिलीप चोरडिया व मराठा सेवा संघ, ग्राहक पंचायत व निसर्ग मित्र समीतींचे साक्री तालुका अध्यक्ष प्राचार्य बी.एम भामरे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष बी. एस. पाटील पुढे म्हणाले की साक्री तालुक्यातील विविध महाविद्यालयातील युवक युवतींसाठी स्पर्धा परीक्षेचे सखोल ज्ञान प्राप्त करता येईल असे स्वतंत्र दालन या छत्रपती वाचनालयात अभ्यासिका कक्ष म्हणून उभे राहिले तर त्याचा जास्तीतजास्त लाभ विद्यार्थ्यांना मिळेल, त्यासाठी लागणारी पुस्तके आपल्या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून उपलब्ध करून देता येतील असे सांगितले.

या प्रसंगी साक्री येथील छत्रपती शिवाजी वाचनालयाच्या निवडणुकीत निवडुन आलेल्या पदाधिका-यांत उपाध्यक्ष सुरेश सोनवणे, सहकार्यवाह ॲड.नरेंद्र मराठे, संचालक प्रा.नरेंद्र तोरवणे, विजय भोसले, प्रा.डी.एन.खैरणार, प्राचार्य प्रो.डॉ.लहु पवार, पी.झेड.कुवर, आर.पी.भामरे, तसेच साक्री तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन ऋतुराज ठाकरे व साक्री तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष विलास देसले यांचा प्राचार्य बी.एस.पाटील व विविध मान्यवरांच्या हस्ते शाल,श्रीफळ, भारताचे संविधान, जिजाऊ ब्रिगेडची स्मरणिका व बुके देवुन सत्कार करण्यात आला.

आपल्या सत्काराला उत्तर देतांना प्रा.नरेंद्र तोरवणे यांनी तालुक्याच्या सार्वत्रिक समस्यांवर उपाय योजनेसाठी जनतेने संघटीत होवुन आंदोलनात्मक पवित्रा घेतला तरच मार्ग निघतो याची उदाहरणे देत जनआंदोलनांसाठी तालुक्यातील जनतेने एकत्र येण्याचे आवाहन केले.या प्रसंगी ऋतुराज ठाकरे व डाॅ दिलीप चोरडिया यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमा मागचा हेतू स्पष्ट करत, विस्तृतपणे प्रास्ताविक प्राचार्य बी. एम. भामरे यांनी केले. साक्री येथील सेवा निवृत्त शिक्षक एम.टी.ठाकरे यांनी सूत्रसंचालन केले. या सत्कार सोहळ्यास चारही संघटनांच्या पदाधिका-यांत दिपक नांद्रे, दिनेश बोरसे, श्यामकांत साळुंखे, निसर्ग मित्र समितीचे साक्री तालुका उपाध्यक्ष संजय बच्छाव ,डाॅ.अजय नांद्रे, प्रवीण मोरे, डाॅ.मनीषा पाटील व, बबीता देवरे यांची उपस्थिती व सहकार्य लाभले.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# डॉक्टर्स डे निमित्त उपजिल्हा रुग्णालय देगलुर येथे डॉक्टरांचा सत्कार

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------------

दिनांक १ जुलै मंगळवार रोजी उपजिल्हा रुग्णालय देगलूर येथे डॉक्टर्स डे च्या निमित्ताने रुग्णसेवा मंडळ औरंगाबाद शाखा देगलूर च्या वतीने वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर सर व रुग्णालयात सेवा देत असलेल्या वैद्यकीय अधिकारी:
डॉ. अनिल थडके,
डॉ. विश्वनाथ मलशेटवार,
डॉ. रवी काळे,



डॉ. महेश पेटकर,
डॉ. राजेश साखरे,
डॉ. चंद्रकांत पाटील,
डॉ. शेख मुजीब,
डॉ. संजय इंगळे,
डॉ. गोदावरी सावळे,
डॉ. फरहीन फारुकी,
डॉ मोना ओहोळ इ. डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी देगलूर रुग्णसेवा मंडळ शाखेचे प्रमुख
श्री मारोतराव पुलचुवाड,
रुग्ण मित्र श्री दोडे,
श्री कळसकर गंगाकुमार,
श्री एस. जी. वासरे,
श्री पी. एच. कुलकर्णी व श्री रामचंद्र दोन्तुंलवाड, यांचे सह रुग्णालयातील अनेक कर्मचारी, अधिकारी उपस्थित होते.

प्रस्ताविक श्री रामचंद्र दोन्तुंलवाड सर यांनी तर आभार प्रदर्शन श्री पी. एच. कुलकर्णी यांनी केले उपजिल्हा रुग्णालय देगलूर तर्फे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर सर सत्काराला उत्तर देताना म्हणाले की अशा या कार्यक्रमामुळे आमचे व रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे मनोबल वाढते, उपजिल्हा रुग्णालय हे रुग्णांना तत्पर सेवा देण्याचा सदैव प्रयत्न करीत राहील.

# हिरापूरच्या आश्रमशाळेच्या जमिनीवर अतिक्रमणाचा खोटा आरोप? उपसरपंच बोपचे यांचा आरोपकर्ता हिरेश बघेलेवर गंभीर पलटवार?

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------



गोरेगाव तालुक्यातील हिरापूर येथील आदिवासी विभागाच्या आश्रमशाळेच्या शेतजमिनीवर जबरदस्तीने नांगरट केल्याचा आरोप ग्रामपंचायत उपसरपंच दिलीप सुखराम बोपचे यांच्यावर करण्यात आला होता. मात्र आता बोपचे यांनी महसूल विभागाकडे लेखी निवेदन सादर करून या सर्व आरोपांना खोटे व बिनबुडाचे ठरवत या प्रकरणात त्यांची बदनामी करण्याचा राजकीय कटकारस्थानाचा आरोप केला आहे.

बोपचे यांनी त्यांच्या निवेदनात म्हटले की, “गट क्रमांक ७२९ व ७३१ या जमिनीवर माझा कोणत्याही प्रकारचा अतिक्रमण नाही. ही आदिवासी विभाग प्रकल्प देवरी यांची अधिकृत मालकीची जमीन आहे. माझ्यावर करण्यात आलेले आरोप हेतुपुरस्सर असून, आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माझी प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केला जात आहे.”

या प्रकरणात बोपचे यांनी गावातील हिरेश बघेले या व्यक्तीवर नाव न घेता आरोप करत म्हटले की, “गावात काही मंडळी खोट्या तक्रारी करून राजकारण करत आहेत. अशा तक्रारींची सखोल चौकशी करून तक्रारदारावर कारवाई करावी.”

प्रकरणाचा इतिहास काय?

हिरापूर गावातील एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभाग, देवरी यांनी तब्बल पंधरा वर्षांपूर्वी साडे पाच एकर जमिन खरेदी करून आश्रमशाळेसाठी राखीव ठेवली होती. याच जमिनीवर नांगरट केल्याचा आरोप उपसरपंच बोपचे यांच्यावर करण्यात आला होता. मात्र आता गावातील काही भूमिहीन अल्पभूधारक शेतकऱ्यांनी पुढे येत स्पष्ट केले की, “आम्हीच काही वेळा त्या जमिनीवर शेती केली होती, परंतु ती जमीन आमची नाही. उपसरपंच बोपचे यांचा या प्रकरणाशी काहीही संबंध नाही.”

साक्षीदारांची कबुली:

भूमिहीन शेतकरी भूमेश भैयालाल बिसेन, टेबुलाल चौधरी, उमेश बिसेन, खोमेंद्र बापचे, गुणीलाल रहांगडाले, मनोज मेश्राम या सर्वांनी एकमुखाने सांगितले की, “ आम्हीच त्या जमिनीवर अतिक्रमण केलं होतं. पण ती जमीन आदिवासी विभागाची आहे. बोपचे यांच्यावर लावलेले आरोप खोटे आहेत.”

ग्रामपंचायतीचा निर्णय:

या वादावर तंटामुक्त समितीमध्ये दोन वेळा सुनावणी झाली होती. त्यामध्ये निर्णय देण्यात आला की, “ कोणतीही व्यक्ती या जागेवर जोत करणार नाही व कोणाचाही वैयक्तिक हक्क मान्य नाही.”

तरीही बघेले नामक व्यक्तीने परतपुन्हा तक्रार करून काही निरपराध भूमिहीन अल्पभूधारक शेतकऱ्यांना आणि उपसरपंच बोपचे यांना लक्ष्य केले. यावर ग्रामपंचायतीचे पदाधिकारी – सरपंच सलीम पठाण, माजी सरपंच विजय बिसेन, पोलीस पाटील आशिष रहांगडाले, तंटामुक्ती अध्यक्ष ध्रुवराज टेभरे यांनी सांगितले की, “ बोपचे यांचा या प्रकरणाशी काहीही संबंध नाही. आरोप राजकीय हेतूने प्रेरित आहेत.”

उपसरपंच बोपचे यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट मागणी केली आहे की, “ या प्रकरणाची सखोल चौकशी करून खरी माहिती जनतेसमोर यावी. तसेच माझी बदनामी करणाऱ्या तक्रारदारावर कायदेशीर कारवाई व्हावी.”

# खमारीत दिव्यांग व निराधारांसाठी विशेष शिबिर जिल्हा प्रशासन व ग्रामपंचायतीचा संयुक्त उपक्रम

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------

गोंदिया जिल्हा परिषद व समाजकल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत खमारी येथे दिव्यांग व निराधार नागरिकांसाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात UDID प्रमाणपत्र वाटप, संजय गांधी निराधार योजना, आधार अद्ययावतिकरण, तसेच रेल्वे प्रवास सवलतीसंबंधी सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. या शिबिरात गोंदिया जिल्हा रुग्णालयाच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्याचबरोबर दिव्यांग व्यक्तींसाठी ग्रामपातळीवर प्रभावी उपाययोजना राबविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. कार्यक्रमास जिल्हा परिषद गोंदिया चे मुख्य कार्यपालन अधिकारी मुरगनाथम, गोंदिया







तहसीलदार समशेर पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती. ग्रामपंचायत खमारीचे सरपंच होमेंद्र भांडारकर, उपसरपंच लीलाबाई उके, जि.प. सदस्य ममताबाई वाळवे, पंचायत समिती सदस्य कणिराम तवाडे, तसेच ग्रामसेवक एम. यू. खाडे यांची उपस्थिती लक्षणीय ठरली. शिबिराच्या यशस्वी आयोजनात ग्रामपंचायत सदस्य अलकेश धोटे, मनोहर साखरे, रंजित गायधणे, क्रांती कुंभरे, परदेश कावळे, धुरपाल मेश्राम, सुभाष तरोने, अनिता भुते, डीलेश्वरी किरणापुरे, सुशीला भांडारकर, सरस्वता मेश्राम, गीता उके, किरण बारापात्रे, अस्विनी गायधणे, अनिता मुणेश्वर यांचे सहकार्य मोलाचे ठरले.

गावकरी आणि लाभार्थ्यांनी शिबिरात मोठ्या संख्येने सहभाग घेतला. अनेक लाभार्थ्यांना विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यात आला. विशेषतः दिव्यांग नागरिकांना UDID प्रमाणपत्र मिळवून देणे, आधार कार्ड अद्ययावत करणे आणि रेल्वे कन्सेशन सवलतीसाठी प्रक्रिया पूर्ण करणे या गोष्टींवर भर देण्यात आला.

हा उपक्रम ग्रामस्तरावर समाजातील वंचित घटकांपर्यंत सरकारी योजना पोहोचविण्याचा एक सकारात्मक प्रयत्न ठरला, अशी प्रतिक्रिया गावकऱ्यांनी व्यक्त केली.

# आषाढी एकादशीला प्रवासी सेवेसाठी येणाऱ्या सर्व एसटी कर्मचाऱ्यांना मोफत भोजन व्यवस्था

राजेश यादव
सोलापूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------

आषाढी एकादशी निमित्त श्री. क्षेत्र पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५२०० बसेसची व्यवस्था केली आहे. ह्या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी व या सर्वांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक व अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची



व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले, गेली कित्येक वर्ष विठुरायाच्या भक्तांची सेवा एसटी व एसटीचे कर्मचारी सातत्याने करत आहेत. ऊन, वारा पाऊस याची तमा न बळगता अतिशय निष्ठेने त्यांचे कर्तव्य ते बजावत असतात. आषाढी वारीच्या काळात त्यांच्या जेवणाची आभाळ होऊ नये, म्हणून यंदा स्वखर्चाने मी सलग तीन दिवस या सर्वांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था (एकादशीला उपवासाचे पदार्थ) करीत आहे. या निमित्ताने माणसातील " विठुराया" ची सेवा करण्याची संधी मला मिळत आहे. अर्थात, हे पुण्य पैशात मोजण्यासारखे नाही. त्यामुळे दरवर्षी अशा प्रकारचा उपक्रम मी राबवणार आहे. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

आषाढी वारीच्या काळात ५,६ व ७ जुलै रोजी चंद्रभागा बसस्थानक, भिमा बसस्थानक, विठ्ठल बसस्थानक व पांडुरंग बसस्थानक येथे सुमारे १३ हजार एसटी कर्मचारी या मोफत भोजन व्यवस्थेचा लाभ घेतील.

# नूतन मराठा विद्यालय छडवेल कोडे येथे युवराज बेडसे यांचा सेवापुर्ती कार्यक्रम संपन्न

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------





दिनांक २८ /६ /२०२५ रोजी नूतन मराठा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय छडवेल कोर्डे येथे सेवानिवृत्त शिपाई आबासो.युवराज गुलाबराव बेडसे यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ आयोजित करण्यात आला. प्रसंगी सुरुवातीस संस्थेचे विश्वस्त व कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.अण्णासाहेब उत्तमराव बोरसे, विद्यालयाचे प्राचार्य मा.रावसाहेब संजयकुमार पाटील पर्यवेक्षक मा.रघुनाथ नागरे, सत्कारमूर्ती आबासो.युवराज गुलाबराव बेडसे, सौ.पुष्पाताई बेडसे, भूषण बेडसे, सौ.पुनम बेडसे यांनी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै.आप्पासाहेब शंकरराव बेडसे व कै.मातोश्री वेणूताई बेडसे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. विद्यालयाचे संगीत शिक्षक राकेश खैरनार व त्यांच्या चमू यांनी स्वागतगीत सादर केले. सेवापुर्ती निमित्ताने सत्कारमूर्ती आबासो.युवराज गुलाबराव बेडसे यांचा सपत्नीक विद्यालयातर्फे स्नेहवस्त्र व भेटवस्तू देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकेत विद्यालयाचे प्राचार्य मा. रावसाहेब संजयकुमार पाटील हे सत्कारमूर्ती आबासो.युवराज गुलाबराव बेडसे यांच्या बद्दल बोलत असताना म्हणाले की सेवानिवृत्ती हि कोरा करकरीत कागद आहे. तुमच्या आयुष्याला नव्याने काहीतरी नवीन बनवण्याची ही वेगळी संधी आहे. या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने साक्री तालुका एज्युकेशन सोसायटी साक्री व नूतन मराठा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय छडवेल कोर्डे यांच्याकडून शुभेच्छा दिल्या तर अध्यक्षीय भाषणात संस्थेचे विश्वस्त मा.अण्णासाहेब उत्तमराव बोरसे यांनी सत्कारमूर्ती आबासो.युवराज गुलाबराव बेडसे यांच्या सोबतच्या काही जुन्या प्रसंगांना उजाळा देऊन सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा दिल्यात. मा.अण्णासाहेब उत्तमराव बोरसे, वस्तीगृह अधीक्षिका श्रीमती सुशीलाताई सूर्यवंशी, शिक्षकेतर कर्मचारी सुनील बेडसे, वस्तीगृह कर्मचारी रेखाताई बेडसे यांनी सत्कारमूर्ती आबासाहेब युवराज गुलाबराव बेडसे यांचा सेवापुर्ती निमित्त शॉल व श्रीफळ देऊन सत्कार केला. कार्यक्रमास विद्यालयाचे शिक्षक प्रतिनिधी हरकलाल पवार , क.महाविद्यालय प्रतिनिधी महेश सावंत, शिक्षकेतर प्रतिनिधी सिद्धार्थ मोहिते भाऊसाहेब, वस्तीगृहाचे अधीक्षक धनराज सूर्यवंशी, अधीक्षिका सुशीलाताई सूर्यवंशी, रेखाताई बेडसे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू आणि भगिनी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक पाडवी यांनी केले.

# राज्यासह धुळे जिल्ह्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार रावल तरुणांचे हात बळकट करण्यास सज्ज

## भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस अंकीत बच्छाव

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------

महाराष्ट्रात महायुती सरकार सरकार विराजित झाल्यापासून आबालवृद्धाना, समाजातल्या प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे काम महायुती सरकार कडून केले जात आहे. महिलांसाठी लाडकी बहीण योजना, श्रवणबाळ योजना, आदिवासी बांधवांसाठी शबरी योजना, अशा अनेक ध्येयपूर्ण योजना अमलात आणून राज्यातल्या शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवण्याचे घोरण हे महायुती सरकार राबवत



आहे. त्याच प्रमाणे "नवतरुण" हा स्वामी विवेकानंदानी म्हटल्याप्रणाणे देवाचा कंठमणी आहे, याच नवतरुण बांधवांसाठी हे महायुती सरकार बळकटी देण्याचे काम करत असून त्यांच्यात नवसंजीवनी भरत आहे. नुकत्याच झालेल्या अंतरीम अर्थसंकल्पत युवकांसाठी "मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना" ही महत्वाकांक्षी योजना अंमलात आणली गेली. या माध्यमातून अनेक युवा बांधवांना हाताला रोजगार मिळाला, मागच्या महिन्यात जिल्ह्याचे पालकमंत्री ना. जयकुमारभाऊ रावल यांनी जिल्यातल्या तरुणांसाठी उदयोग मार्गदर्शन शिबीर आणले त्यातून तरुणांना आर्थिक विकास आणि उद्योग याबाबत मार्गदर्शन लाभले "मुख्यमंत्री फेलोशिप योजनेत" ६० गुणवंत तरुणांना थेट जिल्हाधिकारी कार्यालयात काम करण्याची संधी मिळाली. प्रत्येक परीक्षणार्थी तरुणाला दरमहा ₹ १०,००० पर्यंत विद्यावेतन जाहीर केल. यासाठी दरवर्षी सुमारे ६ कोटी रुपयांची भरीव अशी तरतूद केली आहे.या प्रशिक्षणाच्या माध्यमातून, कौशल्य विकासाच्या माध्यमातून दरवर्षी १० लाख तरुणांना प्रशिक्षण मिळणे शक्य झाले आहे. या सगळ्या लाभदायक योजनांच्या माध्यमातून तरुण बांधवांना बळ देण्याचे काम महायुती सरकार आणि मुख्यमंत्री करत असल्याचे, भाजपा युवा मोर्चाचे धुळे जिल्हा सरचिटणीस अंकीत बच्छाव यांनी म्हटले आहे.

